# प्रकरण - पाचवे

## संशोधन अहवालाचा

## सारांश निष्कर्ष व शिफारशी

## प्रकरण - पाचवे

## संशोधन अहवालाचा सारांश, निष्कर्ष व शिफारशी

### ५.१ सारांश

हिन्दी भाषा आपली राष्ट्रभाषा आहे. देशात बहुतेक राज्यातील लोक हिन्दी बोलू शकतात व हिन्दी समजू शकतात. हिन्दीशी आपला घनिष्ट संबंध आहे. हिन्दी ही आपली राष्ट्रभाषा असली तरिल तरी देशाचा कारभारत इंग्रजीतून चालतो या सारखी दुर्दैवाची गोष्ट नाही. जगातील बहुतेक राष्ट्रे आपल्या भाषेला मानाचे स्थान देतात. सर्व व्यवहारासाठी माध्यमांची भाषा म्हणूनही राष्ट्रभाषेचा वापर करतात. पण आमच्या देशात "हिन्दी हटाव" ची मोहीम हाती घेतली जाते. सर्व राज्यात हिन्दी भाषेचा आदर केला पाहिजे. कोणतेही राज्य त्याला अपवाद असता कामा नये.

हिन्दी राष्ट्रभाषा आहे म्हणून हिन्दी शिक्षकांची जबाबदारी मोठी आहे. या जबाबदारीची जाणीव हिन्दी शिक्षकांना असणे आवश्यक आहे. हिन्दी विषयाच्या शिक्षकाला सर्वात आवश्यक गोष्ट म्हणजे त्याचे भाषेवर प्रभुत्व असणे ही होय. हिन्दी शिक्षकाला हिन्दी शुद्ध स्पष्ट बोलता आली पाहिजे. विद्यार्थ्यांचा वयोगट लक्षात घेऊन त्यानुसार भाषा वापरण्यात योग्य तो बदल करता आला पाहिजे. सोपे करुन शिकविणे हे सर्वात कठीण आहे. वाचनाची कलाही हिन्दी शिक्षकाला चांगली अवगत हवी. वाचनात उच्चार, शब्दफेक, भावपूर्णता, स्तब्धता,

आकलन इत्यादींचा विचार त्याने करणे आवश्यक आहे. भाषेच्या अध्यापनात वाचन, भाषण व लेखन या तीन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. हिन्दी शिक्षकांचे लेखन उत्तम असावे, फलकावरील अक्षर रेखीव असावे. चांगले हस्ताक्षर असणाऱ्या शिक्षकांचे विद्यार्थी अनुकरण करतात व त्यातील बऱ्याच विद्यार्थ्यांचे लेखन नीटनेटके होते असे आढळून येते. हिन्दी भाषा शिक्षकाला हिन्दी भाषेविषयी अभिमान हवा, असे नसेल तर विद्यार्थ्यांच्या मनातही या भाषेविषयी आदर निर्माण होणार नाही. हिन्दी भाषेला समृद्ध आणि संपन्न असा साहित्याचा वारसा आहे. हिन्दी शिक्षकाला या साहित्याचा उत्तम परिचय असला पाहिजे.

मराठी भाषेप्रमाणे हिन्दी भाषा ही संस्कृतोद्भव आहे. त्या एकाच आईच्या दोन मुली आहेत. त्यांच्यात खूप साम्य आहे. हिन्दीतही बरेचसे शब्द संस्कृतमधून आलेले आहेत. हिन्दी आणि मराठी व्याकरणात बरेच साम्य आहे, वाक्य संपल्यावर हिन्दीत चरण दंड देण्याची पद्धत होती. आता "नवभारत टाइम्स" या हिन्दी वृत्तपत्राची सर्व प्रकाशने चरण दण्डाऐवजी संस्कृत-मराठीतील पूर्ण विरामाचा वापर करतात. हिन्दी-मराठी वाक्य रचनेत साम्य आहे. मराठी भाषेप्रमाणेच हिन्दी साहित्य समृद्ध आहे. हिन्दी साहित्यातील संतकाव्य अजरामर आहे. अशा अनेक प्रकारे हिन्दी-मराठी भाषेत साम्य आहे, काही बाबतीत थोडे फरक आहेत. हिन्दी सर्व शाळांमधून द्वितीय भाषा म्हणून शिकविली जाते. हिन्दी शिकविताना शिक्षकांसमोर कोणत्या अडचणी येत असतील शिकताना विद्यार्थ्यांसमोर कोणत्या अडचणी येत असतील हे पाहण्याचा, शोधण्याचा प्रयत्न संशोधकाने सोलापूर शहरातील मराठी माध्यमाच्या शाळांद्वारे केला आहे.

## संशोधन अभ्यासाची गरज

संशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत काही काळ तर वरीष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयात दोन वर्षे हिन्दी अध्यापनाचे कार्य करीत होते. अध्यापन करताना असे प्रकर्षाने संशोधकाला जाणवले की विद्यार्थी हिन्दीचे वाचन, लेखन काळजीपूर्वक करीत नाहीत. वर्गात उत्तरे देताना दोषपूर्ण हिन्दी भाषेचा वापर करतात. विद्यार्थी लेखन दोष व उच्चारण दोष का करतात याच्या मागची कारणे जाणून घ्यावीशी वाटली. संशोधक ज्या माध्यमिक शाळेत अध्यापनाचे कार्य करीत होते त्या शाळेत हिन्दी अध्यापनासाठी आवश्यक असणारे शैक्षणिक साहित्य आढळले नाही त्यामुळे हिन्दीचे अध्यापन शैक्षणिक साहित्याच्या अभावी करावे लागत असे. त्यामुळे हिन्दीतील बारकावे विद्यार्थ्यांना समजत नसत. हिन्दी सहकारी शिक्षकांशी चर्चा करताना असे आढळून आले की शैक्षणिक साहित्याअभावी प्रभावी अध्यापन करता येत नाही. म्हणून संशोधकाने हिन्दी अध्यापन करताना येणाऱ्या समस्यांची माहिती करून घेण्यासाठी सदरहू समस्येची निवड केली.

संशोधक सध्या अध्यापन महाविद्यालयात हिन्दी अध्यापन पद्धतीचे अध्यापन करीत आहे. हिन्दी अध्यापन पद्धतीचे अध्यापन करताना व पाठ मार्गदर्शन करताना विद्यार्थी-शिक्षक प्रत्यक्ष पाठ घेताना सांगितलेल्या गोष्टींचा वापर करीत नाहीत, हिन्दी लेखनात, वाचनात संभाषणात अनेक चुका करतात, पाठ्यांशास अनुसरून शैक्षणिक साहित्यांचा वापर करीत नाहीत. शहरातील शाळांमध्ये विद्यार्थी-शिक्षकांचे पाठ निरीक्षण करण्यास गेले असताना असे दिसून येते की बऱ्याच शाळेमध्ये शैक्षणिक साहित्य उपलब्ध नाहीत, हिन्दी हा विषय पदवी परीक्षा नसणाऱ्या

शिक्षकांना शिक्षविण्यासाठी दिला जातो, त्यामुळे हिन्दीचे अध्यापन करताना अनेक समस्या या शाळांमध्ये प्रकर्षाने जाणवतात. शहरातील माध्यमिक शाळांमध्ये हिन्दी अध्यापनाची सद्य:स्थिती काय आहे हे जाणून घ्यावे असे वाटले.

संशोधनाचे महत्त्व

हिन्दीचे अध्यापन करण्यास हिन्दी शिक्षकाची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता महत्वाची आहे. शाळांमध्ये शिक्षकांची नेमणूक करतांना शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेनुसार शिक्षकांची नेमणूक करण्यासाठी या संशोधनाद्वारे मार्गदर्शन होईल. हिन्दी अध्यापन करताना शिक्षकांना कोणत्या समस्या जाणवतात हे कळण्यास मार्ग मिळेल. विद्यार्थ्यांच्या काय समस्या आहेत, त्यांचे या विषयासंबंधी काय मत आहे हे शिक्षकांना या संशोधनाद्वारे जाणून घेता येईल. तसेच पालकांचे या विषयासंबंधी काय मत आहे, कोणत्या सूचना आहेत हे ही जाणून घेता येईल. त्याचप्रमाणे शाळा प्रमुख या नात्याने मुख्याध्यापकांना या विषयाच्या प्रशासनाच्या वेळी कोणत्या समस्या जाणवतात हे समजण्यास मदत होईल. माध्यमिक शाळेत हिन्दी अध्यापनासाठी शैक्षणिक साहित्याचे महत्त्व लक्षात घेऊन शाळा प्रमुखांना, व्यवस्थापकांना या संबंधी उपाय योजना करण्यास मार्गदर्शन होणार आहे. हिन्दी अध्यापनाचे नियोजन, मूल्यमापन या विषयाचे विविध उपक्रम या संबंधी हिन्दी शिक्षकांना मार्गदर्शन होणार आहे. हिन्दी शिक्षक संघाच्या सभासदांनाही हिन्दी हिन्दी विषया संबंधी मार्गदर्शन होणार आहे तसेच हिन्दीचा अभ्यासक्रम तयार करणा-या तज्ज्ञांनाही या संशोधनाद्वारे विद्यार्थ्यांची, शिक्षकांची, पालकांची मते जाणून घेण्यासाठी या संशोधनाची मदत होईल.

संशोधनाचे वरील महत्त्व लक्षात घेऊन संशोधकाने संशोधनासाठी खालील समस्या निवडली.

शीर्षक

"सोलापूर शहरातील माध्यमिक स्तरावरील हिन्दी अध्यापनाच्या समस्यांचा अभ्यास करणे."

"A STUDY OF PROBLEMS OF HINDI TEACHING IN SECONDARY SCHOOLS OF SOLAPUR CITY".

संशोधनाची उद्दिष्टे

१] शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेचा हिन्दीच्या अध्यापनावर होणा-या अन्य परिणामाचा अभ्यास करणे.

२] शिक्षकांच्या मातृभाषेचा हिन्दी अध्यापनावर होणारा परिणाम पाहणे.

३] हिन्दी अध्यापनाचे नियोजन व मूल्यमापन या संबंधीचा अभ्यास करणे.

४] विद्यार्थी व पालक यांच्या हिन्दी विषयाच्या संदर्भात येणा-या अडचणींचा अभ्यास करणे.

५] माध्यमिक स्तरावर हिन्दी अध्यापनांच्या अन्य समस्यांचा अभ्यास करणे.

## महत्त्वाच्या शब्दांच्या व्याख्या

### सोलापूर शहर

सोलापूर महानगरपालिकेच्या सरहद्दीत असणारा भाग.

### माध्यमिक स्तर

इयत्ता नववी व दहावीपर्यन्तचे शिक्षण ज्या स्तरावर दिले जाते तो स्तर म्हणजेच माध्यमिक स्तर.

## संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

### व्याप्ती -

या संशोधनात सोलापूर शहरातील मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळांमध्ये अध्यापन करणाऱ्या हिन्दी शिक्षकांचा विचार करण्यात येणार आहे. हिन्दी शिक्षकांना हिन्दीचे अध्यापन करताना कोणकोणत्या समस्या भेडसावतात याचा अभ्यास करण्यात येणार आहे.

### मर्यादा

सोलापूर शहरातील शाळांपुरते हे संशोधन मर्यादित राहील. तसेच माध्यमिक स्तरावरील इयत्ता नववी व दहावी वर्गातील हिन्दी विषयापुरतेच हे संशोधन मर्यादित राहील. मराठी माध्यमिक शाळा व्यतिरिक्त इतर शाळांचा समावेश यात केला गेला नाही.

संबंधित संशोधनाचे समीक्षण

या संशोधनात पुढील चार पूर्व संशोधनांचा अभ्यास करुन समीक्षण केलेले आहे.

१] ७१८. महाराष्ट्र राज्य मंडळाचे माध्यमिक शिक्षण : पुण्यातील माध्यमिक शाळांमधील हिन्दी व इंग्रजी अध्यापनाची पाहणी. पुणे, १९६४.

२] ७१९. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण मंडळ, नागपूर आणि औरंगाबाद विभागातील माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाळांमधील हिन्दी आणि इंग्रजी अध्यापनाचे सर्वेक्षण करणे. औरंगाबाद, पुणे १९६६.

३] कुंडले एस्. - मराठी आणि हिन्दीच्या भाषा भेदांचा मराठी भाषिक विद्यार्थ्यांच्या व्दितीय भाषेच्या अध्ययनावर पडणारा प्रभाव अभ्यासणे. पीएच्.डी. एज्युकेशन, नागपूर, १९८२.

४] राजस्थान मधील उच्च माध्यमिक शाळेतील आधुनिक हिन्दी कवितांच्या अध्यापनाच्या दृष्टीने आदानप्रदानाच्या पद्धतींची निश्चिती करणे / शोध घेणे, राजस्थान, दिल्ली यु. १९८१.

संशोधन पद्धती व साधने

पद्धती - संशोधनाचे स्वरुप, उद्दिष्टे व दृष्टिकोन लक्षात घेऊन सदरहू संशोधनासाठी वर्णनात्मक सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

## नमुना निवड

सोलापूर शहरातील मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळेची "अ", "ब", "क", "ड", "इ" ग्रेडप्रमाणे यादी मिळविली व या प्रत्येक ग्रेडमधील एक शाळा लॉटरी पद्धतीने निवडली. अशा एकूण पाच शाळा निवडल्या. या पाच शाळातील नववी, दहावीच्या तुकड्यांची यादी तयार केली. प्रत्येक शाळेतील एक एक तुकडी लॉटरी पद्धतीने निवडली. या सर्व तुकड्यामधील एकूण २२० विद्यार्थी निवडले. ग्रेड प्रमाणे असलेल्या शाळांच्या यादीतून प्रत्येक ग्रेडमधील चार शाळा यादृच्छिक पद्धतीने निवडल्या. अशा एकूण वीस शाळा निवडल्या व या एकूण वीस शाळातील नववी व दहावीला हिन्दी विषय शिकविणा-या शिक्षकांची शाळेप्रमाणे यादी तयार करून प्रत्येक शाळेतील एक-एक शिक्षक लॉटरी पद्धतीने निवडले असे एकूण वीस शिक्षक निवडण्यात आले. यापैकी "इ" ग्रेडच्या एका शाळेतील हिन्दी शिक्षक प्रतिसादक म्हणून उपलब्ध होऊ शकले नाहीत म्हणून एकूण एकोणीस शिक्षकांची निवड करण्यात आली. नमुना गट म्हणून निवडण्यात आलेल्या पाच ग्रेडमधील शाळांच्या पाच मुख्याध्यापकांची निवड केली गेली, आणि लॉटरी पद्धतीचा वापर करून २२० विद्यार्थ्यांच्या एकूण एकतीस पालकांची निवड प्रतिसादक म्हणून करण्यात आली.

## प्रश्नावली

प्रथम विद्यार्थ्यांसाठी, शिक्षकांसाठी व मुख्याध्यापकासाठी संशोधनाच्या उद्दिष्टांना अनुसरून वेगवेगळ्या प्रश्नावल्या तयार केल्या गेल्या. त्या प्रश्नावल्या मार्गदर्शकाकडून दुरुस्त करून घेण्यात आल्या. नंतर काही तज्ञ व्यक्तीकडून त्या तपासून घेतल्या. सांगितलेल्या त्रुटी कमी करून अंतीम स्वरूपाच्या प्रश्नावल्या तयार करण्यात आल्या.

पालकांसाठी मुलाखत तंत्र वापरावयाचे असल्याने त्या मुलाखतीत कोणकोणत्या भागावर भर द्यावा हे निश्चित केले. त्यातही साधारणपणे कोणते प्रश्न विचारुन माहिती गोळा करता येईल याची यादी तयार केली. तज्ज्ञांकडून दुरुस्त करून तिला अंतिम स्वरूप देण्यात आले.

नंतर या प्रश्नावल्या यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने निवडलेल्या व्यक्तींना देण्यात आल्या.

१] या संशोधनामध्ये नमुना निवड पद्धतीने निवडलेल्या शाळांमधील निवडलेल्या एकूण एकोणीस शिक्षकांना प्रश्नावली देऊन याद्वारे माहिती गोळा करण्यात आली.

प्रश्नावली या साधनाद्वारे हिन्दी विषयाला अनुसरुन खालीलप्रमाणे माहिती गोळा करण्यात आली आहे.

हिन्दी व्याकरण, विद्यार्थी संख्या, विद्यार्थ्यांचा वैयक्तिक भेद, विद्यार्थ्यांचे हिन्दी लेखन, विद्यार्थ्यांचे उच्चारण, गद्य विभाग अध्यापन समस्या, पद्य विभाग अध्यापन समस्या, शैक्षणिक साहित्य, हिन्दी लेखन स्पर्धा इत्यादी.

२] नमुना निवड पद्धतीतील लॉटरी पद्धतीने निवडलेल्या एकूण २२० विद्यार्थ्यांकडून प्रश्नावली देऊन खालील विषयावर आधारित माहिती गोळा करण्यात आली आहे.

हिन्दी गद्य विभाग, हिन्दी पद्य विभाग, व्याकरण अध्ययन, शैक्षणिक साहित्य, मातृभाषेचा प्रभाव इत्यादी.

३] संशोधनासाठी निवडलेल्या एकूण पाच शाळामधील पाच मुख्याध्यापकांना ही प्रश्नावली देऊन माहिती गोळा करण्यात आली आहे.

शिक्षकांची निवड, शिक्षकांचे उद्बोधन वर्ग, अध्ययन अध्यापन साहित्य, हिन्दी विषयाचे प्रशासन-अडचणी इत्यादींना अनुसरून ही माहिती प्रश्नावलीद्वारे गोळा करण्यात आली.

मुलाखत

लॉटरी पद्धतीने निवडलेल्या एकूण एकतीस पालकांची मुलाखत माहिती गोळा करण्यासाठी घेण्यात आली. या मुलाखतीमध्ये प्रामुख्याने हिन्दी विषयाचा अभ्यास घेताना पालकांना कोणत्या अडचणी जाणवतात ? मातृभाषेचा प्रभाव हिन्दी अध्ययनावर होतो का ? शिक्षक हिन्दी विषय सुधारण्यासाठी प्रयत्न करतात का ? इत्यादी बाबींवर चर्चा करून त्यांचे म्हणणे नोंदविले.

संख्याशास्त्राचा उपयोग

संशोधन साधनांद्वारे जमा केलेल्या माहितीचा उपयोग करण्यासाठी शेकडेवारी या संख्याशास्त्रीय मापनाचा वापर करण्यात आला आहे.

संशोधनाच्या प्रश्नावली व मुलाखत या साधनांद्वारे माहिती संकलित करून त्या माहितीचे विश्लेषण केले आहे. संकलित केलेली सांख्यिकीय माहिती व तिचे विश्लेषण यावर आधारित निष्कर्ष व शिफारशी पुढील प्रमाणे दिलेल्या आहेत.

## ५.२ निष्कर्ष

१] इयत्ता नववी, दहावीला हिन्दी विषय शिकविणा-या शिक्षकांचा पदवी परीक्षेचा प्रमुख विषय हिन्दी असणारे शिक्षक ७९ टक्के असून २१ टक्के शिक्षक हे इतर विषय घेऊन पदवीधर झालेले आहेत. तसेच पदव्युत्तर परीक्षेस हिन्दी विषय असणारे शिक्षक केवळ ६७ टक्के असून ३३ टक्के शिक्षक इतर विषय घेऊन पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. मात्र १०० टक्के शिक्षकांनी व्यावसायिक पात्रतेची पदवी प्राप्त केलेली दिसून येते. पदवीस हिन्दी विषय असल्यामुळे त्यांच्या विषयाचा निकाल जास्त लागलेला दिसून येतो.

२] मराठी, कन्नड, उर्दू, तेलुगु इत्यादी मातृभाषेचा प्रभाव अध्यापनावर होतो असे दिसून आले. प्रामुख्याने उच्चारावर, संभाषणावर, स्पष्टीकरणावर हा प्रभाव जास्त असलेला दिसून आला. तसेच विद्यार्थी मातृभाषेचा आणि विद्यार्थ्यांच्या परिसरात असलेल्या भाषेचा हिन्दी अध्ययनावर परिणाम होतो.

३] विद्यार्थ्यांच्या हिन्दी विषयासंबंधी मुख्याध्यापकांना इतर समस्यांपेक्षा जास्त शुद्धलेखनासंबंधी व मातृभाषेच्या प्रभावासंबंधीच्या समस्या प्रकर्षाने जाणवतात.

४] हिन्दी अध्यापनाचे नियोजन शिक्षक करतात असे दिसले परंतु नियोजन करताना अध्यापन पद्धती, शैक्षणिक साहित्य व अध्ययन अनुभव या प्रमुख तीन बाबींचा विचार फारच कमी प्रमाणात करतात.

५] हिन्दी विषयाचे मूल्यमापन करण्यासाठी परीक्षा पद्धतीच योग्य आहे असे ६८ टक्के शिक्षकांचे मत आहे. तसेच लेखी परीक्षेबरोबरच तोंडी परीक्षा घेऊन व विविध लेखन, भाषण स्पर्धा घेऊन देखील मूल्यमापन करता येईल असे काही शिक्षक म्हणतात.

हिन्दी विषयाची तोंडी परीक्षा घेतल्यामुळे विद्यार्थ्यांचा बोलण्याचा सराव होतो, आत्मविश्वास वाढतो, उत्तराची नेमकी शब्दरचना कळण्यास मदत होते.

६] शिक्षक हिन्दीचे अध्यापन करताना चित्रे, तक्ते, पोस्टर्स इत्यादी शैक्षणिक साधनांचा वापर अधिक करतात.

७] विविध हिन्दी प्रशिक्षण वर्गास उपस्थित राहणे जास्तीत जास्त शिक्षकांना मनापासून आवडते, त्यांच्यामते त्यामुळे ज्ञानात विशेष भर पडते व विषयाची उजळणी होते.

८] हिन्दी गद्य आणि पद्य विभागांच्या तुलनेने व्याकरण अवघड वाटणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे. अशाच प्रकारचे मत जवळपास सर्व बालकांचे असलेले दिसून येते.

९] व्याकरणाचा सराव करुन घेतला जात नाही व व्याकरण मनापासून आवडत नाही त्यामुळे जास्तीत जास्त मुलांना व्याकरण अवघड वाटते.

१०] विद्यार्थी शुद्धलेखनाच्या चुका खूप करतात तसेच त्यांच्या उच्चारणामध्ये देखील जास्त चुका होतात याचे प्रमुख कारण म्हणजे त्यांच्या मातृभाषेचा होणारा प्रभाव होय.

११] हिन्दी लेखन स्पर्धांचे आयोजन शाळेत केल्याने जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो, हिन्दीचे ज्ञान वाढण्यास मदत होते, तसेच विद्यार्थ्यांचे लेखन, वाचन वाढते आणि अक्षर सुधारते.

१२] शाळेत हिन्दी विषयाच्या विविध स्पर्धा घेतल्यामुळे विद्यार्थ्यांचे हिन्दी सुधारते असे पालकांना वाटते.

१३] पद्य विभाग शिकताना कवितेची अवघड भाषा ही प्रमुख अडचण विद्यार्थ्यांना जाणवते.

१४] वर्गामध्ये विद्यार्थी संख्या अधिक असल्यास विद्यार्थ्यांकडे अधिक लक्ष देता येत नाही. ही प्रमुख अडचण शिक्षकांना भेडसावते तसेच वर्गात बैठक व्यवस्थेची समस्या भेडसावते.

१५] नियमितपणे स्वाध्यायाच्या स्वरूपात गृहपाठ द्यावेत असे जास्तीत जास्त पालकांना वाटते. तसेच या बरोबर व्याकरण व वाचन क्रियेवर गृहपाठ असावेत असेही पालकांना वाटते.

१६] शिक्षक विद्यार्थ्यांचे हिन्दीचे अक्षर सुधारण्यासाठी जादा तास न घेता उपलब्ध तासिकेतच विविध प्रकारचे प्रयत्न करतात असे बहुतेक विद्यार्थ्यांचे मत आहे.

१७] विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक अडचणी व आर्थिक परिस्थितीचा परिणाम हिन्दी अध्ययनावर होतो.

१८] जास्तीत जास्त शाळांमध्ये ग्रंथालयाची सोय असून त्यात हिन्दी विषयाची पुस्तके, मासिके व शब्दकोश आहेत.

## ५.३ शिफारशी

संशोधनाच्या प्रश्नावली आणि मुलाखत या साधनांद्वारे प्राप्त केलेल्या माहितीचे विश्लेषण करून संशोधनाच्या शिफारशी पुढील प्रमाणे आहेत.

१] विद्यार्थ्यांच्या हिन्दी विषयाचा अधिक अभ्यास करून घेण्यासाठी शिक्षकांनी स्वत:च्या प्रयत्नांबरोबरच पालकांचेही सहकार्य घ्यावे.

२] विद्यार्थ्यांच्या हिन्दी विषयासंबंधी शुद्धलेखनाची व मातृभाषेची, या दोन समस्या प्रामुख्याने शिक्षकांनी दूर कराव्यात.

३] हिन्दीच्या गद्य व पद्य विभागाबरोबर व्याकरणाचा भाग देखील सोप्या पद्धतीने शिकविण्याचा प्रयत्न करावा. व्याकरणाचा सराव करून घ्यावा.

४] शिक्षकांनी विद्यार्थ्यांना लेखन स्पर्धेबरोबर भाषण स्पर्धेतही भाग घेण्यास प्रोत्साहित करावे.

५] शाळेत विविध मातृभाषेच्या विद्यार्थ्यांना राष्ट्रभाषा हिन्दीचे शुद्ध रूप जाणून घेण्यासाठी विविध प्रसार माध्यमांचा उपयोग करून घेण्याची सवय शिक्षकांनी विद्यार्थ्यांना लावावी.

६] हिन्दी भाषा शिकताना मातृभाषेचा प्रभाव हिन्दी भाषेवर जास्त पडतो याची दक्षता शिक्षकांनी स्वत: घ्यावी व या संबंधी विद्यार्थ्यांवरदेखील नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करावा.

७] शिक्षकांनी हिन्दी विषयात विद्यार्थ्यांची प्रगती होण्यासाठी विविध प्रकारची शैक्षणिक साधने वापरण्याचा व आवश्यक असल्यास जादा तास घेण्याचा प्रयत्न करावा.

८] अभ्यासक्रम मंडळाने हिन्दीच्या नवीन अभ्यासक्रमामध्ये कवितांचे प्रमाण सध्या पेक्षा जास्त ठेवण्याचा व तसेच व्याकरणासाठी पुस्तकात भरपूर स्वाध्याय ठेवण्याचा प्रयत्न करावा.

९] हिन्दी विषयासाठी वेळापत्रकात सध्यापेक्षा जास्त तासिका ठेवाव्यात.

१०] प्रशासकीय मंडळांनी वर्गातील बैठक व्यवस्था व योग्य विद्यार्थी संख्येचा विचार करुन वर्गरचना तयार करावी.

११] शिक्षकांनी विद्यार्थ्यांमधील असणारा वैयक्तिक भेद लक्षात घेऊन आपल्या अध्यापनामध्ये आवश्यक तेथे बदल करण्याचा प्रयत्न करावा.

१२] शिक्षकांनी विद्यार्थ्यांमधील अस्पष्ट शब्दोच्चार हा प्रमुख दोष दूर करण्यासाठी अधिक तास घेण्याचा प्रयत्न करावा.

१३] मूल्यमापनासाठी फक्त ठराविक पद्धतींचाच अवलंब न करता इतर पद्धतींचा अवलंब देखील करावा.

१४] हिन्दी विषयात प्रगती होण्यासाठी शिक्षकांनी हिन्दी विषयाची पुस्तके जास्तीत जास्त प्रमाणात वाचण्याचा प्रयत्न करावा.

१५] विद्यार्थ्यांची हिन्दी विषयामधील प्रगती करून घेण्यासाठी शाळेत या विषयाच्या विविध स्पर्धा आयोजित कराव्यात.

१६] शिक्षकांनी विद्यार्थ्यांना नियमितपणे गृहपाठ द्यावेत व त्यामध्ये लेखनाबरोबर व्याकरण व वाचन क्रियेवर आधारित देखील गृहपाठ देण्याचा प्रयत्न करावा.

## ५.४ पुढील संशोधनार्थ विषय

१] सोलापूर जिल्हयातील इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांमधील हिन्दी अध्यापनाच्या समस्यांचा अभ्यास करणे.

२] सोलापूर शहरातील प्राथमिक स्तरावरील हिन्दी अध्यापनाच्या समस्यांचा अभ्यास करणे.

३] उर्दू माध्यमाच्या माध्यमिक शाळांमधील हिन्दी अध्यापनाच्या समस्यांचा अभ्यास करणे.

# संदर्भ ग्रंथ

व

# परिशिष्टे

## संदर्भ ग्रंथ सूची


1) AGARWAL J.C. — "EDUCATIONAL RESEARCH"
Arya Book Depot, New Delhi,
Second Edition, 1975, Pages 304

2) BUCH M. B. — "A SURVEY OF RESEARCH IN EDUCATION"
Published by M.S. University of Baroda,
First Edition , March 1974.

3) BUCH M. B. — "SECOND SURVEY OF RESEARCH IN EDUCATION"
Published by Society for Educational
Research and Development, Baroda,
First Edition, 1979.

4) BUCH M. B. — "THIRD SURVEY OF RESEARCH IN EDUCATION"
Published by New Delhi N.C.E.R.T.1987.

5) BUCH M. B. — "FORTH SURVEY OF RESEARCH IN EDUCATION"
Volume I (1983-88), New Delhi,
Published at the Publication
Department by the Secretary National
Council of Educational Research and
Training, New Delhi 1991.

6) PAWAR N.G. — "THEORY AND PRACTICES OF TEACHING
ENGLISH LANGUAGE" Nutan Prakashan,
Pune, First Edition, 1995, Pages 157.

| | | |
|---|---|---|
| ७] | ओक सुमन | "शैक्षणिक तंत्रविज्ञान"<br>श्री विद्या प्रकाशन पुणे, व्दितीय आवृत्ती १९९५, पृष्ठ संख्या २५६ |
| ८] | अकोलकर ग. वि.<br>पाटणकर ना. वि. | "शालेय व्यवस्था आणि प्रशासन"<br>नीलकंठ प्रकाशन, पुणे, आठवी आवृत्ती १९८९, पृष्ठ संख्या ४३५ |
| ९] | बापट भा. गो. | "शैक्षणिक संशोधन"<br>नूतन प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती १९८८ पृष्ठ संख्या २२० |
| १०] | कुलकर्णी विश्वंभर | "उदयोन्मुख भारतीय समाज, संस्कृती आणि शिक्षण" श्री विद्या प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती, १९९४, पृष्ठ संख्या १३४ |
| ११] | करंदीकर सुरेश | "शैक्षणिक मानसशास्त्र"<br>फडके प्रकाशन कोल्हापूर, प्रथमावृत्ती, १९९४, पृष्ठ संख्या ३५२ |
| १२] | करंदीकर सुरेश | "मराठी अध्यापन पद्धती"<br>फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती १९९६, पृष्ठ संख्या ३०० |
| १३] | केणी सज्जनराम<br>कुलकर्णी हरिकृष्ण | "हिन्दी की अध्यापन पद्धति"<br>व्हीनस प्रकाशन पुना, व्दितीय संस्करण, १९७३, पृष्ठ संख्या ३७६. |
| १४] | जगताप ह. ना. | "शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र"<br>नूतन प्रकाशन, पुणे, व्दितीय आवृत्ती, १९९१, पृष्ठ संख्या ३२७. |

१५] दांडेकर वा. ना. "शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र"
श्री विद्या प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती १९७४
पृष्ठ संख्या ४०९

१६] पारसनीस न. रा. "प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र"
नूतन प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती
१९९१, पृष्ठ संख्या ४३२

१७] प्रसाद केशव "हिन्दी शिक्षण"
प्रकाशन - धनपतराय ॲण्ड सन्स दिल्ली,
प्रथम संस्करण १९८९, पृष्ठ संख्या २७६

१८] पठान नसीम "हिन्दी विषय ज्ञान"
प्रकाशिका - सुभद्रादेवी अर्जुनराव काळे,
सोलापूर, प्रथम संस्करण १९८८
पृष्ठ संख्या ३५४

१९] भोसले कुन्दा "माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण समस्या"
प्रकाशन - कुन्दा भोसले, प्रथमावृत्ती १९९४
पृष्ठ संख्या १५९

२०] भिंताडे वि. रा. "शैक्षणिक संशोधन पद्धती"
नूतन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९७४,
पृष्ठ संख्या १५१.

२१] माटेकर प्र.म. — "हिन्दी मराठी भाषा का तुलनात्मक अध्ययन और अध्यापन"
शशि-प्रभा प्रकाशन, सोलापूर
प्रथम संस्करण १९८९, पृष्ठ संख्या ७८.

२२] मुळे रा.शं.
उमाठे वि.तु. — "शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे"
महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, दुसरी आवृत्ती १९८७.

२३] योगेंद्रजीत भाई — "हिन्दी भाषा शिक्षण"
प्रकाशन - विनोद पुस्तक मंदिर आगरा
अष्टादश संस्करण १९८७,
पृष्ठ संख्या ४९३.

२४] साठे ग.न. — "राष्ट्रभाषा का अध्यापन"
महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणे
संशोधित तृतीय पुनर्मुद्रण १९७१,
पृष्ठ संख्या २८०.

परिशिष्ट "अ"

विनंती पत्र

संशोधनाचा विषय : "सोलापूर शहरातील माध्यमिक स्तरावरील हिन्दी अध्यापनाच्या समस्यांचा अभ्यास करणे."

मार्गदर्शक : प्रा. डॉ. बोंदाडे के. एम्.
कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर

संशोधन : कु. धाराशिवकर एम्. एम्.
सोशल कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर

*****

श्री / श्रीमती -----------
-----------------------

महोदय,

शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फिल्. पदवीसाठी मी "सोलापूर शहरातील माध्यमिक स्तरावरील हिन्दी अध्यापनाच्या समस्या"संबंधी संशोधन करीत आहे, यासाठी आपल्या मदतीची जरुरी आहे. सोबतची प्रश्नावली आपण भरुन द्यावी ही विनंती. आपण दिलेल्या माहितीचा इतरत्र कोठेही वापर केला जाणार नाही याची मी खात्री देते. प्रश्नावलीत भरुन घेतलेली माहिती ही खाजगी स्वरुपात असेल. आपणाकडून येणा-या माहितीचा अभ्यास करुन संबंधित विषयासंबंधी योजना आखणे शक्य होणार आहे. माझ्या या अभ्यास योजनेत आपले सहकार्य मिळेल अशी आशा आहे.

आपली विश्वासू

[ कु. धाराशिवकर एम्. एम्. ]
सोलापूर सोशल कॉलेज ऑफ एज्युकेशन
सोलापूर

## परिशिष्ट "ब"

### सोलापूर शहरातील ग्रेडप्रमाणे शाळांची यादी

| ग्रेड | शाळेचे नांव |
|---|---|
| "अ" | १] हरिबाई देवकरण प्रशाला |
| | २] मॉडर्न हायस्कूल |
| | ३] सिद्धेश्वर कन्या प्रशाला |
| | ४] सुयश विद्यालय |
| | ५] सोनामाता कन्या विद्यालय |
| | ६] इंदिरा कन्या प्रशाला |
| | ७] बालविकास मंदिर |
| | ८] विद्या विकास हायस्कूल |
| "ब" | १] सिद्धेश्वर हायस्कूल |
| | २] कुचन हायस्कूल |
| | ३] नीलकंठेश्वर प्रशाला |
| | ४] भारतीय विद्यापीठ हायस्कूल |
| | ५] दिगंबर जैन गुरुकुल हायस्कूल |
| | ६] नूतन विद्यालय |
| | ७] उमाबाई श्राविका हायस्कूल |
| | ८] विमल कन्या प्रशाला |
| | ९] सोशल हायस्कूल |
| | १०] जांब मुनी प्रशाला |
| "क" | १] लोकसेवा हायस्कूल |
| | २] संभाजीराव शिंदे विद्या मंदिर |
| | ३] अहिल्याबाई प्रशाला |

| ग्रेड | शाळेचे नांव |
|---|---|
| "क" | ४] रावजी सखाराम हायस्कूल |
| | ५] महावीर हायस्कूल |
| | ६] विवेकानंद प्रशाला |
| | ७] महात्मा फुले प्रशाला |
| | ८] डी. के. आसावा हायस्कूल |
| | ९] छत्रपती शिवाजी हायस्कूल |
| "ड" | १] लालबहादूर शास्त्री हायस्कूल |
| | २] सोलापूर हायस्कूल |
| | ३] नवलभाई शहा म्युनिसिपल कोठारी हायस्कूल |
| | ४] अण्णाप्पा काडादी हायस्कूल |
| | ५] नेताजी सुभाष चंद्र बोस हायस्कूल |
| | ६] भारतरत्न डॉ. आंबेडकर प्रशाला |
| | ७] जे. रा. चंडक कन्या प्रशाला |
| | ८] रामचंद्र प्रशाला |
| | ९] सहयाद्री प्रशाला |
| | १०] कम प्रशाला |
| "इ" | १] न्यू हायस्कूल |
| | २] एस. एच. एन. गर्ल्स हायस्कूल |
| | ३] रामगोंडाप्पा कैंगनाळकर हायस्कूल |
| | ४] वीडी घरकुल प्रशाला |
| | ५] मार्कंडेय हायस्कूल |
| | ६] सहस्त्रार्जुन हायस्कूल |
| | ७] मल्लिकार्जुन हायस्कूल |
| | ८] पंचशील विद्यालय |
| | ९] डॉ. आंबेडकर हायस्कूल |
| | १०] श्री लक्ष्मण महाराज प्रशाला |
| | ११] सुरवसे हायस्कूल |

परिशिष्ट "क"

निवड केलेल्या शिक्षकांची व मुख्याध्यापकांची यादी

| अ.क्र. | नांव | शाळेचे नांव | ग्रेड |
|---|---|---|---|
| | शिक्षकांची यादी | | |
| १] | सौ. रजनी परमेश्वर सोनटक्के | सिद्धेश्वर कन्या प्रशाला | अ |
| २] | सौ वैद्य माणिक भगवंत | सोनामाता कन्या विद्यालय | अ |
| ३] | सौ. सुरेखा आनंदराव करंडे | मॉडर्न हायस्कूल | अ |
| ४] | श्री तोडकरे ए. एस्. | बालविकास मंदिर | अ |
| ५] | सौ निर्मला बाबुराव लंगोटे | सिद्धेश्वर हायस्कूल | ब |
| ६] | श्री राठोड गोपीनाथ शिवाजी | नीलकंठेश्वर प्रशाला | ब |
| ७] | श्री करजगीकर बाबुलाल हुसेनसो. | सोशल हायस्कूल | ब |
| ८] | डांगे अ. गनी महिबूब | जांबमुनी प्रशाला | ब |
| ९] | श्रीमती मनीशा गांधी | संभाजीराव शिंदे विद्यामंदिर | क |
| १०] | सौ. शेख अनीसा अ. कय्युम | रावजी सखाराम हायस्कूल | क |
| ११] | श्री जमादार हसनसाब महिबूबसाब | अहिल्याबाई प्रशाला | क |
| १२] | श्री चव्हाण राजशेखर भावरु | लोकसेवा हायस्कूल | क |
| १३] | श्री हक्के पांडुरंग हणमंत | जे. रा. चंडक कन्या प्रशाला | ड |
| १४] | सौ. वैशाली वी. हुक्केरी | लालबहादूर शास्त्री हायस्कूल | ड |
| १५] | श्री अ. कादर बाबुलाल साहेब | आण्णाप्पा काडादी हायस्कूल | ड |
| १६] | श्री कापसे बाळासाहेब विश्वनाथ | सोलापूर हायस्कूल | ड |
| १७] | श्री चंद्रशेखर म. भंरले. | मार्कंडेय हायस्कूल | इ |
| १८] | श्री पठाण मलिक जैनोद्दिन | वीडी घरकूल प्रशाला | इ |
| १९] | श्री नागेश कल्लप्पा बंडे | डॉ. आंबेडकर हायस्कूल | इ |

| अ.क्र. | नांव | शाळेचे नांव | ग्रेड |
|---|---|---|---|
| | मुख्याध्यापकांची यादी | | |
| १] | सौ. कानडे एस. बी. | सोनामाता कन्या विद्यालय | अ |
| २] | श्री कारीगर एम. ए. | सोशल हायस्कूल | ब |
| ३] | सौ. शेख बी. ए. | अहिल्याबाई प्रशाला | क |
| ४] | श्री. आर. बी. बळप | सोलापूर हायस्कूल | ड |
| ५] | श्री सामल विलास चंद्रकांत | वीडी घरकूल प्रशाला | ड |

## परिशिष्ट "ड"

## विद्यार्थी - प्रश्नावली

अ] खालील प्रत्येक प्रश्नाच्या योग्य उत्तरासमोर असलेल्या चौकटीत ✓ अशी खूण करा.

१] खालीलपैकी तुम्ही कोणता पाठ्यक्रम घेतला आहे ?

अ] फक्त हिन्दी ☐ ब] हिन्दी संस्कृत ☐

२] हिन्दी विषय तुम्हाला शिकण्यास कसा वाटतो ?

अ] सोपा ☐ ब] अवघड ☐

३] हिन्दी विषय शिकताना ज्या क्रमाने भाग सोपा वाटतो तो क्रम १, २, ३ अशा क्रमांकाने त्या समोरील चौकटीत लिहा.

अ] गद्य ☐ ब] पद्य ☐ क] व्याकरण ☐

४] हिन्दी विषयाचे व्याकरण कसे वाटते ?

अ] सोपे ☐ ब] अवघड ☐

५] तुमच्या शाळेत हिन्दी विषयासंबंधी कोणत्या स्पर्धा घेतल्या जातात ?

अ] भाषण स्पर्धा ☐ ब] लेखन स्पर्धा ☐

६] या स्पर्धांपैकी तुम्ही कोणत्या स्पर्धात भाग घेता ?

अ] भाषण स्पर्धा ☐ ब] लेखन स्पर्धा ☐

७] तुमचे अक्षर लेखन, शुद्धलेखन सुधारण्यासाठी तुमचे शिक्षक प्रयत्न करतात काय ?

अ] होय ☐ ब] नाही ☐

८] तुमचे हिन्दीचे शिक्षक हिन्दीच्या तासाला तुमच्याशी हिन्दीतून बोलतात का ?

अ] होय ☐ ब] नाही ☐

९] तुमची मातृभाषा कोणती ?

अ] मराठी ☐ ब] कन्नड ☐ क] तेलुगु ☐ ड] उर्दू ☐

१०] हिन्दी भाषा शिकताना तुमच्या मातृभाषेचा प्रभाव हिन्दी भाषेवर पडतो का ?

अ] होय ☐ ब] नाही ☐

११] हिन्दी विषयाचा अभ्यास तुमचे पालक घरी करुन घेतात का ?

अ] होय ☐ ब] नाही ☐

१२] तुम्ही हिन्दी विषयासंबंधी अधिक माहिती मिळविण्याचा प्रयत्न करता का ?

अ] होय ☐ ब] नाही ☐

ब] खालील प्रत्येक विधानांच्या / प्रश्नांच्या उत्तरासाठी अनेक विधाने दिलेली आहेत. त्यापैकी जी, जी उदाहरणे उत्तरासाठी योग्य वाटतात त्या विधानांच्या क्रमांकावर ✓ खुण करा.

१३] अ] हिन्दी विषय सोपा वाटण्याची कारणे कोणती ?

१] हिन्दी ही भाषा समजण्यास सोपी आहे.

२] हिन्दी विषयाचे पाठ सोपे आहेत.

३] हिन्दी विषयाच्या कविताही सोप्या व समजतील अशाच असतात.

४] आमचे हिन्दीचे शिक्षक खुप चांगले शिकवितात.

५] घराच्या आसपास हिन्दी बोलणारे लोक आहेत.

६] आई-वडिलांनाही हिन्दी विषय समजतो व ते ही या विषयाचा अभ्यास घेतात.

७] घरी मोठे भाऊ-बहीण शाळेत जाणारे आहेत, ते सुद्धा या विषयाचा अभ्यास घेतात.

८] या विषयाचा व्याकरणाचा भाग हा थोड्या प्रयत्नाने चांगला समजतो.

९] शाळेमध्ये या विषयाच्या स्पर्धा घेतल्या जातात.

१०] शिक्षक या विषयाचा जादा अभ्यास करुन घेतात.

ब] हिन्दी विषय अवघड वाटण्याची कारणे कोणती ?

१] हिन्दी भाषा समजण्यास अवघड आहे.

२] हिन्दी विषयाचे पाठ अवघड आहेत.

३] आई-वडील शिकलेले नाहीत व ते या विषयाचा अभ्यास घरी घेऊ शकत नाहीत.

४] या विषयाचे व्याकरण खूप अवघड जाते.

५] या विषयातील कविता अवघड वाटतात.

६] घराच्या आसपास हिन्दी कोणालाही येत नाही.

७] घरी भाऊ-बहीण कोणीही शाळेत जाणारे नाहीत त्यामुळे ते ही अभ्यास घेऊ शकत नाहीत.

८] आमच्या हिन्दी विषय शिकविणा-या शिक्षकांचे शिकविणे आम्हाला समजत नाही.

९] शाळेमध्ये या विषयाशी संबंधित स्पर्धा कधीच घेतल्या जात नाहीत.

१०] या विषयासंबंधी जादा सराव करुन घेतला जात नाही.

१४] व्याकरण अवघड वाटण्याची पुढीलपैकी कोणती कारणे आहेत ?

१] दुस-या भाषा विषयाचे व्याकरण अवघड जाते त्याप्रमाणेच या विषयाचे ही अवघड जाते.

२] शिक्षक चांगले शिकवत नाहीत,

३] शिक्षक चांगले शिकवितात परंतु व्याकरण मनापासून आवडत नाही.

४] व्याकरणाचा सराव करुन घेतला जात नाही.

५] शिक्षक व्याकरणाचा भागच घेत नाहीत.

१५] गद्य पाठ शिकताना जाणवणाऱ्या अडचणी कोणत्या ?

१] हिन्दी शुद्ध लेखनाच्या चुका नेहमी होतात.

२] हिन्दीतील विरामचिन्हांचा वापर कसा करावा हे कळत नाही.

३] वाचन शुद्ध स्पाने करता येत नाही.

४] आम्ही घरी जी भाषा बोलतो त्या भाषेचे शब्द लिहिताना व वाचताना उच्चारले जातात.

५] शिक्षकांचे शिकविणे कळत नाही.

६] शिक्षक कधीही या विषयासाठी शैक्षणिक साहित्य वापरत नाहीत.

७] शिक्षक या विषयाचा जादा सराव करुन देत नाहीत.

८] या विषयाचे स्वाध्याय देण्याचे प्रमाण कमी आहे.

९] आम्ही घरुन करुन आणलेले स्वाध्याय शिक्षक तपासत नाहीत.

१०] गद्य पाठातील व्याकरणाचा भाग कठीण वाटतो.

१६] पद्य विभाग शिकविताना जाणवणाऱ्या अडचणी कोणतया ?

१] गद्य पाठातील भाषे पेक्षा कवितेची भाषा अवघड असते.

२] कविता चाल लावून शिकवली नाही तर अवघड वाटते.

३] कवितेला विविध चाली लावून शिक्षकांना शिकविता येत नाही.

४] शाळेमध्ये विविध दृक-श्राव्य साधने उपलब्ध नाहीत.

१७] तुमचे हिन्दी विषय शिकविणारे शिक्षक तुमची या विषयात प्रगती व्हावी यासाठी काय प्रयत्न करतात ?

१] हा विषय चांगला समजावा म्हणून विविध पद्धतींनी समजावून देण्याचा प्रयत्न करतात.

२] शिकविताना विविध साधने वापरतात.

३] शिकविताना खूप प्रश्न विचारतात.

४] प्रत्येक तासाला स्वाध्याय देतात.

५] आमचे स्वाध्याय नियमितपणे तपासतात व चुका समजावून देतात.

६] गैरहजर राहिल्यास खूप रागावतात.

७] या विषयाचे जादा तास घेतात.

८] आमच्या पालकांशी सतत संपर्क साधतात.

९] हिन्दीच्या विविध गुणवत्ता परीक्षांना जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना बसविण्याचा प्रयत्न करतात.

१८] भाषण व लेखन स्पर्धेत भाग घेतल्याने तुम्हाला त्याचे पुढील पैकी कोणते फायदे होतात ?

१] लेखन स्पर्धेत भाग घेतल्याने लेखनामध्ये खूप सुधारणा झाली.

२] विविध शुद्ध लेखनाच्या नियमांची ओळख झाली.

३] सुंदर हस्ताक्षराचे महत्त्व पटले.

४] लिहिताना व्याकरणदृष्टया शुद्ध लिहावे याला किती महत्त्व आहे ते कळले.

५] लिहिताना मुख्य मुद्दयांचा समावेश करणे, परिच्छेद पाडणे याचा सराव झाला.

६] विविध वक्तृत्व स्पर्धात भाग घेतल्याने बोलण्याचा आत्मविश्वास वाढला.

७] बोलताना मुख्य मुद्दयांचा समावेश कसा करावा हे कळले.

८] आवाजातील चढ उताराचे महत्त्व कळाले.

९] बोलताना विरामचिन्हांनुसार बदल करावा लागतो हे कळाले.

१०] हिन्दी भाषा शुद्ध रूपाने बोलल्यास ती अधिक सुंदर बनते हे खरोखरच जाणवले.

१९] शिक्षक अक्षर सुधारण्यासाठी प्रयत्न करीत असल्यास कशा प्रकारे करतात ?

१. शुद्ध लेखन सुधारण्यासाठी व अक्षर सुधारण्यासाठी लेखन सराव करुन देतात.
२. जादा तास देऊन लेखन सुधारण्याचे प्रयत्न करतात.
३. गृहकार्य / स्वाध्याय नियमितपणे देतात.
४. स्वाध्याय न चुकता तपासतात व चुका सुधारण्यास सांगतात.
५. पालकांना अभ्यास करुन घेण्यास सूचना देतात.

२०] हिन्दी विषय शिकविताना तुमचे शिक्षक खालील पैकी कोणकोणती शैक्षणिक साधने वापरतात ?

१] चित्रे २] तक्ते ३] नकाशे
४] टेपरेकॉर्डर ५] रेडिओ ६] दूरचित्रवाणी
७] चित्रफिती ८] पोस्टर्स ९] हालचालदर्शक चित्रे
१०] विविध प्रतिकृती ११] पारदर्शी
१२] फिल्मस्ट्रीप्स

## परिशिष्ट "इ"

## शिक्षक - प्रश्नावली

अ] पुढील प्रश्नांच्या उत्तरासाठी खाली काही पर्याय दिले आहेत. ज्या ठिकाणी पर्याय दिले आहेत तेथे योग्य त्या पर्यायांच्या क्रमांकावर ✓ खूण करा.

१] आपली शैक्षणिक पात्रता काय आहे ?

१] १२ वी — ५] एम्. ए.
२] बी. ए. — ६] एम्. एस्. सी.
३] बी. एस्. सी. — ७] एम्. कॉम.
४] बी. कॉम

२] आपल्या पदवी परीक्षेचा प्रमुख विषय कोणता आहे ?

१] हिन्दी — २] भूगोल
३] अर्थशास्त्र — ४] इंग्रजी

३] आपला पदव्युत्तर परीक्षेचा विषय कोणता आहे ?

१] हिन्दी — २] मराठी
३] इंग्रजी — ४] उर्दू

४] आपली व्यावसायिक पात्रता सांगा.

१] डी. एड्. — २] बी. एड्.
३] हिन्दी सिनीअर — ४] अप्रशिक्षित
४] एम्. एड्.

५] बी. एड्. असल्यास बी. एड्. च्या अध्यापन पद्धती कोणत्या ?

१] हिन्दी-मराठी — २] हिन्दी भूगोल
३] हिन्दी-इतिहास

६] आपला शैक्षणिक अनुभव

१] १ ते ५ वर्षे २] ६ ते १० वर्षे
३] ११ ते १५ वर्षे ४] १६ ते २० वर्षे
५] २१ ते २५ वर्षे ६] २६ ते ३० वर्षे
७] ३१ ते ३५ वर्षे

७] नववी व दहावीत हिन्दी शिकविण्याचा अनुभव.

१] १ ते ५ वर्षे २] ६ ते १० वर्षे
३] ११ ते १५ वर्षे ४] १६ ते २० वर्षे
५] २१ ते २५ वर्षे ६] २६ ते ३० वर्षे
७] ३१ ते ३५ वर्षे

८] आपण शिकवित असलेल्या वर्गाचा हिन्दी विषयाचा निकाल साधारणपणे किती टक्के लागतो ?

१] २० टक्केचे खाली २] २० ते ३५ टक्के
३] ३५ टक्के ते ५० टक्के ४] ५० ते ७० टक्के
५] ७० टक्केच्या पुढे

ब] पुढील प्रश्नांच्या उत्तरासाठी खाली पर्याय व विधाने दिली आहेत. योग्य उत्तराच्या विधानांच्या अक्षरांवर / खुण करा.

१] विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी हिन्दी विषयातुन जी उद्दिष्टे साध्य व्हावयास हवी ती साध्य होतात का ?

अ] होय ब] नाही

२] या इयत्तांच्या हिन्दी विषयाच्या अभ्यासक्रमात बदल व्हावा असे वाटत असल्यास कोणत्या प्रकारचा बदल आपणास अपेक्षित आहे ?

अ] हिन्दी विषयाच्या पुस्तकांची भाषा कठीण व समजण्यास अवघड अशी आहे ती सोपी करावी.

ब] गद्य पाठांचे प्रमाण जास्त आहे ते प्रमाण कमी व्हावे.

क] कवितांचे प्रमाण कमी आहे त्या थोडया वाढवाव्यात.

ड] कवितांचे प्रमाण जास्त आहे त्यांचे प्रमाण कमी व्हावे.

इ] व्याकरण अवघड आहे ते सोपे व्हावे.

३] आणखी कोणत्या नवीन गोष्टींचा या इयत्तांच्या अभ्यासक्रमात समावेश व्हावा असे आपणास वाटते ?

१] लेखन सुधारण्यासाठी काही प्रमाणात लेखन करुन घेण्यास अभ्यास क्रमात वाव असावा.

२] हिन्दी शब्द व वाक्यांचे उच्चारण सराव करण्यासाठी फक्त वाचन सराव व्हावा असे पाठ ही त्यात हवेत.

३] व्याकरण सराव व्हावा म्हणून त्या त्या ठिकाणी भरपूर स्वाध्याय हवेत.

४] हिन्दी विषयासाठी मिळणा-या तासिका पुरेश्या आहेत का ?

अ] होय　　　　　　ब] नाही

५] जादा तासिका घेतल्यास प्रामुख्याने त्यात खालीलपैकी कोणते कार्य केले जाते ?

१] अभ्यासक्रम पूर्ण करणे

२] व्याकरणाचा सराव घेणे

३] अक्षर सुधारणे

४] शुद्ध लेखनाचा सुधार करुन घेणे

५] अभ्यासक्रम पूर्ण झाला असल्यास जादा सराव करुन घेणे.

६] निबंध लेखन करुन घेणे.

६] हिन्दीचे पाठ शिकविताना त्याचे नियोजन करता का ?

अ] होय ब] नाही

७] नियोजनात खालील पैकी कोणकोणत्या भागांचा आपण समावेश करता ?

अ] पाठ व टाचण काढणे

ब] महत्वाचे मुद्दे लिहून काढणे.

क] शैक्षणिक साहित्य कोणते वापरावेत याचा विचार करणे

ड] स्वाध्याय कोणता द्यावा हे ठरविणे.

इ] कोणते अध्ययन अनुभव द्यावेत याचा विचार करणे.

ई] पाठ्य मुद्दा स्पष्ट करताना व्यवहारातील भागांशी सांगड घालणे.

उ] विद्यार्थ्यांना त्या संदर्भात असणारी माहिती कोणत्या प्रश्नांद्वारे मिळविता येईल याचा विचार करणे.

अ] अध्यापन पद्धती ठरविणे.

८] विद्यार्थ्यांच्या हिन्दी विषयाच्या गुणवत्ता वाढीसाठी आपल्या शाळेत कोणते विशेष कार्यक्रम राबविले जातात ?

अ] अभ्यासाचा जादा सराव करुन घेण्यासाठी जादा तासिका घेतल्या जातात.

ब] प्रश्नोत्तर पाठ करुन घेतले जातात.

क] जादा लेखन करुन घेतले जाते.

ड] गृहकार्य रोजच्या रोज दिले जाते.

इ] चाचणी आठवड्यातून घेतली जाते.

ई] अधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस दिले जाते.

उ] हिन्दी विषयाचा अभ्यास घरी घेण्यासाठी पालकांना भेटून सांगितले जाते.

ऊ] असे विशेष कार्यक्रम राबविण्यासाठी वेळ मिळत नाही.

९] खालीलपैकी इतर कोणत्या योजना आखल्या जातात.

अ] हिन्दी ही राष्ट्रभाषा आहे म्हणून तिचे महत्त्व पटवून दिले जाते.

ब] विद्यार्थी शुद्ध लेखन कसे करतील याच्या प्रयत्नासाठी योजना आखल्या जातात.

क] विद्यार्थ्यांचे हिन्दी भाषण वाचन उत्कृष्ट असावे यासाठी विविध योजना आखल्या जातात.

ड] विद्यार्थ्यांनी या संबंधी मिळविलेल्या यशाचे गुणगान केले जाते.

इ] या विषयात वार्षिक परीक्षेत पहिला क्रमांक मिळविणा-या विद्यार्थ्यांना पारितोषिक दिले जाते.

ई] व्याकरणाचा भाग अवघड वाटत असल्यास तो अधिकात अधिक सोपा करुन कसा शिकविता येईल यासंबंधी वारंवार विचार केला जातो.

१०] नववी व दहावीच्या प्रत्येक वर्गामध्ये विद्यार्थी संख्या किती आहे.

अ] ५० पर्यन्त

ब] ५० ते ७० पर्यन्त

क] ६० ते ७० पर्यन्त

ड] ७० च्या पुढे

११] वर्गामध्ये विद्यार्थीसंख्या अधिक असल्यास कोणत्या अडचणी भेडसावतात ?

अ] वर्ग नियोजन करणे कठीण वाटते.

ब] अध्यापन करणे कठीण जाते.

क] विद्यार्थ्यांकडे अधिक लक्ष देता येत नाही.

ड] जादा अभ्यास करुन घेणे जमत नाही.

इ] गृहपाठ दिल्यास तपासणे अवघड जाते.

ई] परीक्षेचे पेपर तपासण्याचे काम वाढते.

उ] अधिक गुणवत्ता वाढ करण्यात अपयश येते.

ऊ] अधिक लक्ष देता न आल्याने विद्यार्थी नाराज होतात.

ए] विद्यार्थ्यांकडे अधिक लक्ष देता न आल्याने त्यांच्या गुणवत्तेत वाढ करण्यात अपयश आल्यास मुख्याध्यापकांचे बोलणे ऐकावे लागते.

ऐ] पालक विद्यार्थ्यांकडे लक्ष न दिल्यास नाराज होतोत.

ओ] वर्गात बैठक व्यवस्थेच्या समस्या भेडसावतात.

१२] विद्यार्थ्यांमध्ये असणारा वैयक्तिक भेद या कारणामुळे कोणत्या समस्या भेडसावतात ?

अ] आपली शिक्षण पद्धती ही सर्वसामान्य विद्यार्थ्यांसाठीच उपयुक्त आहे त्यामुळे कुशाग्र बुद्धिच्या मुलांची कुचंबणा होते.

ब] सावकाश शिकणा-या मुलांसाठी वेगळ्या अध्यापन पद्धती / योजना असाव्यात असे वाटते.

क] विद्यार्थ्यांचा वैयक्तिक भेद पाहता कोणत्या पद्धतीने शिकवावे ही समस्या जाणवते.

ड] सर्व विद्यार्थ्यांना सारख्याच प्रकारची प्रेरणा देता येत नाही.

१३] विद्यार्थ्यांसमोर कोणत्या प्रकारच्या वैयक्तिक अडचणी येतात ?

क] काही विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असते.

ख] काहींना शाळा खूप लांब पडते.

ग] काही विद्यार्थ्यांना छोटी मोठी कामे करुन घर चालवावे लागते.

घ] काही मुलांना विशेषत: मुलींना घरची कामे खूप करावी लागतात.

च] काही विद्यार्थ्यांना मानसिक समाधान लाभत नाही.

छ] काही विद्यार्थ्यांचे घरचे वातावरण अभ्यासास उपयुक्त नसते.

ज] वर्गात काही विद्यार्थ्यांचे ~~घरचे वातावरण अभ्यासास~~ एकमेकात पटत नाही.

झ] परिसर सर्व दृष्टिने अभ्यासास अयोग्य असतो.

त] काही विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम पेलवत नाही

थ] काही वेळा शाळेच्या वातावरणाशी त्यांचे समायोजन होत नाही.

द] काही शिक्षक विद्यार्थ्यांना नाउमेद करतात.

ध] काही विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम अवघड वाटतो.

१४] विद्यार्थ्यांसमोर आर्थिक परिस्थितीमुळे या विषयासंदर्भात पुढीलपैकी कोणत्या समस्या भेडसावतात ?

अ] विद्यार्थ्यांची मानसिक स्थिती अभ्यासास उपयुक्त नसते.

ब] विद्यार्थी गणवेश, पुस्तके, वहया सहजासहजी विकत घेऊ शकत नाहीत.

क] विद्यार्थ्यांना रिकाम्या पोटी तत्त्वज्ञान शिकविणे बरोबर वाटत नाही.

१५] विद्यार्थ्यांच्या हिन्दी लेखनामध्ये पुढीलपैकी कोणत्या बाबी आढळतात ?

अ] काही विद्यार्थ्यांचे अक्षर चांगले नसते.

ब] विरामचिन्हांचा वापर योग्य प्रकारे करीत नाहीत.

क] मनातील विचार प्रत्यक्ष हिन्दी भाषेत लिहिता येत नाहीत.

ड] मातृभाषेचा प्रभाव लेखनावर पडतो.

इ] लेखनात व्याकरणदृष्टया चुका आढळतात.

ई] विद्यार्थी जादा लेखन सराव करण्यास कंटाळतात.

उ] शुद्ध लेखनाच्या खूप चुका करतात.

१६] विद्यार्थ्यांच्या हिन्दी उच्चारणामध्ये कोणत्या प्रकारचे दोष जाणवतात ?

अ] अस्पष्ट शब्दोच्चार

ब] असंबंध बोलणे

१७] विद्यार्थ्यांच्या हिन्दी उच्चारणामध्ये असणा-या चुका खालील कारणामुळे होतात असे वाटते.

अ] उच्चारणावर मातृभाषेचा प्रभाव पडतो.

ब] विद्यार्थी हिन्दी उच्चारण भेद जाणून घेण्यास कंटाळा करतात.

क] घराभोवतालच्या परिसराचा प्रभाव बोलण्यावर पडतो.

ड] अभ्यासक्रमामध्ये बोलण्याची क्षमता वाढविण्यास वाव नाही.

इ] शब्द, वाक्य उच्चारणामध्ये सुधारणा करण्यास उपलब्ध तासिका अपु-या आहेत.

ई] शुद्धलेखनाचे नियम विचारात न घेता शब्द व वाक्य उच्चारले जातात.

१८] इयत्ता नववी व दहावीच्या हिन्दी अध्यापनातील गद्य विभागाचे अध्यापन करताना पुढीलपैकी कोणत्या समस्या भेडसावतात ?

क] विद्यार्थ्यांच्या मातृभाषेचा अध्ययनावर व अध्यापनावर परिणाम होतो.

ख] विद्यार्थ्यांची वैयक्तिक क्षमता

ग] मुख्याध्यापकांची असहकार्य वृत्ती

घ] अपु-या तासिका

च] शाळेत घेतल्या जाणा-या परीक्षांचे प्रमाण कमी.

छ] शाळेत घेतल्या जाणा-या परीक्षांचे प्रमाण जास्त.

ज] शाळेतील भौतिक सुविधांची कमतरता.

झ] शिक्षकांच्या स्वत:च्या मातृभाषेचा प्रभाव

त] विद्यार्थ्यांचे असहकार्य

थ] शैक्षणिक साहित्य शाळेत उपलब्ध नाहीत.

द] शैक्षणिक साहित्य वापरणे शक्य नाही.

ध] शैक्षणिक साहित्य तयार करणे शक्य नाही.

न] व्याकरणाचा भाग शिकविणे अवघड जाते.

१९] पद्य विभागाचे अध्यापन करताना पुढीलपैकी कोणत्या समस्या भेडसावतात ?

प] पाठ्यपुस्तकात कवितांचे प्रमाण जास्त आहे.

फ] कविता विद्यार्थ्यांच्या मानाने अवघड आहेत.

ब] शाळेमध्ये संदर्भ ग्रंथांचा अभाव आहे.

भ] कविता चाल लावून किंवा गाऊन शिकविता येत नाही.

२०] शाळेमध्ये शैक्षणिक साहित्य विकत घेता का ?

अ] होय ब] नाही

२१] आपण हिन्दी विषयाचे अध्यापन करताना पुढीलपैकी कोणते शैक्षणिक साहित्य वापरता ?

अ] चित्रे ब] तक्ते क] नकाशे

ड] पोस्टर्स इ] व्यंगचित्रे ई] पारदर्शी

उ] स्लाईडस् ऊ] चित्रपिट्टीका ए] फ्लॅशकार्डस

ऐ] रेडिओ ओ] फ्लिप पुस्तके औ] हालचालदर्शक चित्रे

अं] दूरदर्शन अः] टेपरेकॉर्डर

२२] आपण विविध शैक्षणिक साहित्य वापरल्याने आपले अध्यापन अधिक प्रभावी होते असे आपणास वाटते का.

अ] होय ब] नाही

२३] आपण पुढीलपैकी कोणते मोफत / अल्पखर्ची साहित्य अध्यापनासाठी वापरता ?

अ] पृथ्वीचे गोल

ब] विविध प्रसार माध्यमाची मिळणारी चित्रे

क] वैद्यकीय क्षेत्राद्दारा प्रसारित ब चित्रे

२४] आपल्या शाळेत विविध लेखन स्पर्धांचे आयोजन केले जाते का ?

अ] होय ब] नाही

२५] अशा प्रकारच्या भाषण लेखन स्पर्धा आयोजित केल्याने विद्यार्थ्यांना त्याचे कोणते फायदे होतात असे तुम्हाला वाटते ?

क] विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो.

ख] विद्यार्थ्यांचे लेखन सुधारते.

ग] विद्यार्थ्यांचे वाचन सुधारते.

घ] विद्यार्थ्यांचे अक्षर सुधारते.

च] विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते.

छ] विद्यार्थ्यांचे भाषण सुधारते

ज] सर्जनशील वृत्ति बनते.

झ] हिन्दी विषयाचे ज्ञान वाढण्यास मदत होते.

२६] विविध स्पर्धा आयोजित करताना कोणत्या विशेष अडचणी जाणवतात ?

अ] आर्थिक समस्या जाणवते.

ब] शाळेत वर्ग अपुरे पडतात.

क] विद्यार्थी अशा स्पर्धांत भाग घेण्यास पुढाकार घेत नाहीत.

ड] मुख्याध्यापक करावे तसे सहकार्य करीत नाहीत.

इ] शाळेच्या कामातून वेळ मिळत नाही.

२७] विद्यार्थ्यांच्या हिन्दी विषयाच्या अध्ययनात सुधारणा करण्यासाठी ज्या विविध योजना आखण्यात येतात त्याव्दारे विद्यार्थ्यांची खरोखरच शैक्षणिक प्रगती होते का ?

अ] होय ब] नाही.

२८] हिन्दी अध्ययन सुधारण्यासाठी ज्या योजना राबविल्या जातात त्यामध्ये खालील गोष्टी जाणवतात.

क] विद्यार्थी अत्यंत उत्साह दाखवतात.

ख] विद्यार्थी अशा योजनांबद्दल नाखुश असतात.

ग] विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत खूपच वाढ होते.

घ] विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत सर्वसाधारण वाढ होते.

च] सावकाश शिकणा-या मुलांना असे कार्यक्रम झेपत नाहीत.

छ] तीव्र बुद्धिमत्तेच्या मुलांनाच विशेष फायदा होतो.

ज] पालक अत्यंत खुश असतात व सहकार्य करतात.

झ] पालकांना अशा कार्यक्रमात विशेष रस नसतो.

प] मुख्याध्यापक अशा कार्यक्रमांसाठी खूप सहकार्य करतात

फ] शाळेत वर्ग अपुरे पडतात व पाहिजे तसे कार्यक्रम राबवता येत नाहीत.

ब] शाळा शहरापासून खूपच लांब असल्याने असे कार्यक्रम राबविण्यासाठी जास्त वेळ शाळा सुटल्यावर मुलांना थांबवता येत नाही व लवकरही बोलावता येत नाही.

२९] हिन्दी अध्यापनावर हिन्दी अध्यापनाच्या शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेचा परिणाम होतो असे आपणास वाटते का ?

अ] होय ब] नाही

३०] आपण शिक्षकांच्या अनुभवात, ज्ञानात वाढ करणा-या हिन्दी विषयाच्या कृतीसत्रात भाग घेता का ?

अ] होय ब] नाही

३१] शिक्षकांसाठी जे विविध प्रशिक्षण वर्ग भरविण्यात येतात त्यासाठी उपस्थित राहणे मनापासून आवडते का ?

अ] होय ब] नाही

३२] अशा प्रशिक्षण वर्गात उपस्थित राहणे आवडत असल्यास त्याची पुढीलपैकी कोणती कारणे आहेत ?

अ] अशा प्रशिक्षण वर्गात उपस्थित राहिल्याने शिक्षकांच्या ज्ञानात विशेष भर पडते.

ब] अनुभव कक्षा रुंदावतात.

क] नवीन अद्ययावत ज्ञानाशी शिक्षकांचा परिचय होतो.

ड] नवीन शिक्षक असतील तर त्यांचा आत्मविश्वास वाढतो.

इ] प्रशिक्षण वर्गात उपस्थित राहिल्याने विशिष्ट विषयांची उजळणी होते.

ई] शाळेच्या कामकाजातून सूट मिळते.

३३] अशा प्रशिक्षण वर्गास उपस्थित राहणे आवडत नसल्यास त्याची पुढीलपैकी कोणती कारणे आहेत ?

क] अशा प्रशिक्षण वर्गामुळे शिक्षकांच्या ज्ञानात विशेष भर पडत नाही.

ख] नवीन शिक्षकांना असे वर्ग उपयुक्त ठरतात. अनुभवी शिक्षकांना विशेष लाभ होत नाही.

३४] आपले मुख्याध्यापक आपणास हिन्दी विषयाच्या उद्‌बोधन वर्गास उपस्थित राहण्याची प्रेरणा देतात का ?

अ] होय  ब] नाही

३५] हिन्दी विषय समृद्ध होण्यासाठी आणखी कोणते उद्‌बोधन वर्ग शिक्षकांसाठी असावेत असे आपणास वाटते त्यांची नावे लिहा.

अ]  ब]  क]  ड]

३६] हिन्दी विषयाची चर्चासत्रे घडवून आणावित असे आपणास वाटते का ?

अ] होय  ब] नाही

३७] हिन्दी विषय शिकविणारे इतर सहकारी शिक्षक हिन्दी विषयासंबंधी चर्चा करतात का ?

अ] होय  ब] नाही

३८] या चर्चेमध्ये प्रामुख्याने पुढीलपैकी कोणते भाग चर्चिले जातात.

क] विद्यार्थी दर्जा

ख] शैक्षणिक साहित्य

ग] बुलेटीन तास

घ] प्रशिक्षण वर्ग

च] विद्यार्थी गुणवत्ता

छ] आपापसातील मतभेद

ज] शाळेतील विविध घटक

झ] कुशाग्र विद्यार्थ्यांबद्दल चर्चा

३९] आपली परीक्षा पद्धती आपणास कशी वाटते ?

अ] योग्य ब] अयोग्य

४०] परीक्षा पद्धतीत बदल व्हावा असे वाटत असल्यास पुढीलपैकी कोणती कारणे ?

अ] सध्याच्या परीक्षा पद्धतीमुळे विद्यार्थ्यांचे अचूक मुल्यमापन होत नाही.

ब] परीक्षेमुळे विद्यार्थ्यांच्या मनावर प्रच दडपण येते.

क] शिक्षकांच्या हातून पक्षपातीपणा घडू शकतो.

ड] सावकाश शिकणारी मुले मागेच राहतात. परीक्षेमुळे त्यांना काही प्रेरणा मिळत नाही.

इ] काही विद्यार्थी लेखन कार्य करण्यापेक्षा व्यवस्थित रितीने बोलू शकतात.

४१] परीक्षा पद्धतीत बदल होऊ नये असे वाटत असल्यास पुढीलपैकी कोणती कारणे ?

प] परीक्षेमुळे विद्यार्थी वेळच्यावेळी अभ्यास करतात.

फ] परीक्षेमुळे शिक्षक व विद्यार्थी सतत कार्यरत असतात.

ब] परीक्षेच्या स्पर्धेमुळे त्यांच्या गुणवत्तेत वाढ होते.

भ] परीक्षा पद्धती बदलली तरी नवीन पद्धतीनी विद्यार्थ्यांचे योग्य मूल्यमापन होईलच हे सांगता येत नाही.

४२] हिन्दी विषयाचे मूल्यमापन कोणत्या पद्धतीने केले जाते. ?

अ] विविध लेखी परीक्षा घेऊन.

ब] तोंडी परीक्षा घेऊन

क] विद्यार्थ्यांचे निरीक्षण करून

ड] शैक्षणिक साहित्य वापरून

इ] विविध लेखन भाषण स्पर्धा घेऊन

ई] विद्यार्थ्यांना वेळच्या वेळी प्रश्न विचारून

उ] अभ्यासानुवर्ती कार्यक्रमांद्वारे

४३] हिन्दी विषयाची तोंडी परीक्षा घेतल्यामुळे नेमके कशाचे मूल्यमापन होते ?

क] तोंडी परीक्षा घेतल्यामुळे हिन्दी विषयातून बोलण्याचा सराव विद्यार्थी करतात.

ख] विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो.

ग] विद्यार्थ्यांचे या विषयातील शब्दांचे उच्चारण सुधारते.

घ] विद्यार्थ्यांना उत्तरे देताना नेमकी शब्दरचना कशी करावी हे कळते.

४४] तुमच्या शाळेत ग्रंथालय आहे का ?

अ] होय ब] नाही

४५] ग्रंथालयामध्ये हिन्दी विषयाची विविध पुस्तके मासिके, पुरवणी पुस्तके शब्दकोश इत्यादी उपलब्ध आहेत का ?

अ] होय ब] नाही

४६] ग्रंथालयाचा वापर तुम्ही हिन्दीचे अध्यापन करण्यासाठी कसा करता ?

अ] शब्द कोश वापरुन

ब] पाठ किंवा कविता ज्या पुस्तकातून घेतल्या आहेत ते वाचून, त्यांच्या मागचा पुढचा संदर्भ वापरुन

क] संदर्भ पुस्तके वाचून

ड] विश्वकोश वापरुन

४७] आपण हिन्दीची कोणती पुस्तके वाचली आहेत त्यांची नावे लिहा.

१. २. ३. ४.

४८] दूरदर्शनवरील हिन्दी कार्यक्रम आपण पाहता का ?

अ] होय ब] नाही

४९] दूरदर्शनवरील हिन्दी कार्यक्रम शिकविण्यासाठी आपणास पूरक ठरतात का ?

अ] होय ब] नाही

५०] दूरदर्शनवरील हिन्दी कार्यक्रम खालील कोणत्या कोणत्या बाबतीत पूरक वाटतात ?

१] हिन्दी शब्दांचे नीट उच्चारण समजण्यासाठी

२] हिन्दी वाक्ये कशी बोलावीत हे समजते.

३] एखादी गोष्ट कशी सांगितली जाते त्याचे प्रत्यक्ष रुप कळते.

४] काव्य वाचन कार्यक्रमांद्वारे कवितेची रचना कळते / कविता कशी गायीली जाते हे कळते.

५] राष्ट्रभाषा हिन्दीचे महत्त्व कळते.

६] संत, नेता, महत्त्वाची व्यक्तीचरित्रे यांच्यावर आधारित चित्रपट पहायला मिळतात त्याचा उपयोग अध्यापनासाठी होतो.

७] अभिनयाचे विविध पैलू पहावयास मिळतात व त्याचा उपयोग अध्यापनासाठी होतो.

८] देशाच्या विविध भागांचे प्रत्यक्ष दर्शन होते व अध्यापनाच्या वेळी योग्य वर्णन करता येते.

९] हिन्दीचे बहुसंख्य समानार्थी, विरुद्धार्थी शब्द ऐकावयास मिळतात.

१०] सर्व राज्यातील संस्कृतींचे प्रत्यक्ष दर्शन होते.

११] हिन्दीतील महान कवी व त्यांचे विचार ऐकावयास मिळतात.

१२] विविध वार्ता, बातम्या हिन्दीतूनच ऐकावयास मिळतात, त्यांचा उपयोग अध्यापनाच्या वेळी होतो.

५१] आपली मातृभाषा कोणती ?

अ] मराठी ब] उर्दू क] कन्नड ड] तेलुगु

५२] आपल्या मातृभाषेचा प्रभाव हिन्दी अध्यापनावर होतो का ?

अ] होय ब] नाही

५३] मातृभाषेचा प्रभाव हिन्दी अध्यापनावर पडत असेल तर तो पुढीलपैकी कशा प्रकारे ?

अ] गद्य पाठ शिकविताना तोंडावर मातृभाषेचे शब्द येतात.

ब] कविता व व्याकरण शिकविताना मातृभाषेचे शब्द मध्ये अडथळा आणतात.

क] हिन्दी संभाषणाच्या वेळी मातृभाषेचे शब्द व वाक्य उच्चारले जातात.

ड] लेखन करतानाही लेखनावर मातृभाषेचा प्रभाव पडतो.

## परिशिष्ट "ई"

## मुख्याध्यापक प्रश्नावली

खालील प्रत्येक विधानासमोर उत्तरे दिली आहेत योग्य उत्तराच्या चौकटीत ✓ खूण करा.

१] आपल्या शाळेत ९ वी ते १० वी वर्गामध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांची संख्या प्रत्येक वर्गात खालीलप्रमाणे आहे.

१] ५० पेक्षा कमी   २] ५० ते ६०

३] ७० पेक्षा जास्त

२] आपल्या शाळेतील ९वी व १० वी इयत्तेस हिन्दी शिकविणा-या शिक्षकांची निवड शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेनुसार केली आहे काय ?

१] होय   २] नाही

३] हिन्दीचे विविध उपक्रम राबविण्यासाठी हिन्दी शिक्षकांकडून व इतर सहका-यांकडून योग्य ते सहकार्य मिळते का ?

१] होय   २] नाही

४] आपण हिन्दी विषय शिकविणा-या शिक्षकांना विविध लेखन वाचन स्पर्धा घेण्यास प्रोत्साहित करता का ?

१] होय   २] नाही

५] आपल्या शाळेतील हिन्दी विषयाचे शिक्षक उजळणी वर्ग, चर्चा सत्रे, सेवांतर्गत शिक्षक प्रशिक्षण इत्यादीस उपस्थित राहतात का ?

१] होय   २] नाही

६] हिन्दी विषय शिक्षक विद्यार्थ्यांच्या हिन्दी विषयाचा अधिक अभ्यास घेण्यासाठी प्रयत्न करतात का ?

१] होय   २] नाही

७] शिक्षकांच्या हिन्दी विषयासंबंधात काही वैयक्तिक अडचणी असल्यास त्या तुम्ही सोडवता काय ?

१] होय २] नाही

●] खालील प्रत्येक प्रश्नाच्या उत्तरासाठी अनेक विधाने दिली आहेत. योग्य विधानांच्या क्रमांकांना ✓ खूण करा. एकापेक्षा जास्त विधाने लागू असतील तर त्या सर्व विधानांच्या क्रमांकावर ✓ खूण करा.

८] तुमच्या शाळेत हिन्दी अध्यापनासाठी आवश्यक असलेले खालीलपैकी कोणते शैक्षणिक साहित्य उपलब्ध आहे ?

१] विविध तक्ते ४] विविध शब्दकोश

२] नकाशे ५] विविध संदर्भ पुस्तके

३] पोस्टर्स

९] हिन्दी विषयाच्या प्रशासनाच्यावेळी आपणासमोर पुढीलपैकी कोणत्या अडचणी येतात ?

१] हिन्दी विषयासाठी मिळणाऱ्या तासिका अपुऱ्या आहेत.

२] या विषयाची गुणवत्ता सुधारण्यासाठी शिक्षक जादा तास देण्यास तयार नसतात.

३] जादा तासांसाठी विद्यार्थीही नाराज असतात.

४] शिक्षक विद्यार्थ्यांच्या विविध वैयक्तिक अडचणी सोडविण्याचे प्रयत्न करीत नाहीत.

५] पालक या विषयाबद्दल उदासीन असतात.

१०] हिन्दी विषयाच्या अद्ययावत ज्ञानासाठी आपणास कोणकोणते उपक्रम राबवावे लागतात ?

१] नवनवीन ज्ञानात भर टाकणारी पुस्तके आणण्यासाठी जागरुकता ठेवावी लागते.

२] विविध दृक-श्राव्य साधने वापरण्यासाठी शिक्षकांना प्रोत्साहित करावे लागते.

३] विविध प्रशिक्षण वर्गास शिक्षकांना पाठविण्याचे प्रयत्न करावे लागतात.

४] ग्रंथालयात हिन्दी विषयाची पुस्तके, संदर्भ ग्रंथ, शब्दकोश संग्रहित करून ठेवणे आवश्यक असते.

५] या विषयासंबंधी नवनवीन पद्धती, तंत्रे, साधने वापरण्याची प्रेरणा शिक्षकांना द्यावी लागते.

११] हिन्दी विषय शिक्षक विद्यार्थ्यांचा अधिक अभ्यास घेत असल्यास कशा प्रकारे ?

१] रोज या विषयाचे स्वाध्याय देतात.

२] स्वाध्याय वेळच्या वेळी तपासून देतात.

३] आठवड्यातून एकदा या विषयाची चाचणी घेतात.

४] विविध लेखन स्पर्धा आयोजित करतात.

५] जादा तास घेऊन सराव करवून घेतात.

६] पालकांना हिन्दी विषयाचा अभ्यास करवून घेण्यासाठी विनंती करतात.

७] विद्यार्थ्यांना या विषयासंबंधी जादा वाचनाची सवय लावण्याचा प्रयत्न करतात.

१२] विद्यार्थ्यांच्या हिन्दी विषयासंबंधी कोणत्या समस्या जाणवतात ?

१] मातृभाषेच्या प्रभावाची समस्या ब मोठी वाटते.

२] विद्यार्थी शुद्धलेखनाच्या नियमांचा विचार करून लेखन करीत नाहीत.

३] विद्यार्थी या विषयासाठी ग्रंथालयाचा वापर करीत नाहीत.

४] शिक्षकांच्या मातृभाषेचा परिणाम त्यांच्या अध्यापनावर पडतो.

५] परिसरात असलेल्या भाषांचा प्रभाव हिन्दी अध्यापनावर पडतो.

## परिशिष्ट "उ"

## पालकांच्या मुलाखतीचा आराखडा

१] संपूर्ण नांव

२] शिक्षण

३] आपणास हिन्दी विषय कसा वाटतो ?

४] हिन्दी विषयातील गद्य, पद्य, व्याकरण व रचना या विभागांपैकी कोणता विभाग अवघड वाटतो ?

५] मातृभाषेचा प्रभाव विद्यार्थ्यांच्या हिन्दी भाषेच्या अध्ययनावर पडतो का ?

६] हिन्दी विषयाच्या प्रगतीसाठी शाळेत कोणत्या स्पर्धा घेतल्या जातात ? विद्यार्थी कोणत्या स्पर्धांत भाग घेतात ?

७] हिन्दी विषयासंबंधी विविध स्पर्धा शाळेत घेतल्यामुळे विद्यार्थ्यांना त्याचा कोणता फायदा होतो ?

८] विद्यार्थ्यांच्या हिन्दी भाषेच्या अध्ययनावर परिसरातील भाषांचा परिणाम होतो का ?

९] आपणास हिन्दी विषयाचे पाठ्यपुस्तक कसे वाटते ?

१०] हिन्दी विषय शिकविण्यासाठी शिक्षकांनी शैक्षणिक साधने वापरावीत का ?

११] शिक्षक हिन्दी विषय सुधारण्यासाठी प्रयत्न करतात का ?

१२] या विषयाचे गृहपाठ देणे आवश्यक आहे का ?

१३] शिक्षक जे गृहपाठ देतात ते योग्य अंतराने देतात का ?

१४] गृहपाठामध्ये विविधता असते का ?

१५] मुले गृहपाठ वेळेवर करतात का ?

१६] गृहपाठ करून घेण्यासाठी आपण इतर कोणती साधने वापरता ?

xxxxx